शीघ्र आध्यात्मिक उन्नतीसाठी ‘गुरुकृपायोग’ : खंड १

# गुरुकृपायोगानुसार साधना

## गुरुकृपा सतत होण्यासाठी गुरुकृपायोगानुसार साधना करा !

मराठी (Marathi)


**संकलक**

हिंदु राष्ट्राच्या स्थापनेचा उद्‌घोष करणारे

**सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत बाळाजी आठवले**

**सद्‌गुरु (डॉ.) चारुदत्त प्रभाकर पिंगळे**



**सनातन संस्था**




**卐 सनातनच्या ग्रंथांची भारतातील भाषांनुसार संख्या 卐**

मराठी ३४४, इंग्रजी २०१, कन्नड १९८, हिंदी १९५, गुजराती ६८, तेलुगु ४५, तमिळ ४३, बंगाली ३०, मल्ल्याळम् २४, ओडिया २२, पंजाबी १३, नेपाळी ३ अन् आसामी २

**मार्च २०२४ पर्यंत ३६५ ग्रंथांच्या १३ भाषांत ९६ लाख ३१ सहस्र प्रती प्रसिद्ध !**

# ग्रंथाच्या संकलकांचा परिचय

## सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले यांच्या अद्वितीय कार्याचा संक्षिप्त परिचय



१. अध्यात्मप्रसारार्थ ‘सनातन संस्थे’ची स्थापना

२. शीघ्र ईश्वरप्राप्तीसाठी ‘गुरुकृपायोग’ या साधनामार्गाची निर्मिती : गुरुकृपायोगानुसार साधना करून २०.३.२०२४ पर्यंत १२७ साधक संत झाले, तर १,०५३ साधकांची संतत्वाच्या दिशेने वाटचाल चालू आहे.

३. आचारधर्मपालन, देवता, साधना, आदर्श राष्ट्ररचना, धर्मरक्षण आदी विविध विषयांवर विपुल ग्रंथ-निर्मिती

४. हिंदुत्ववादी नियतकालिक ‘सनातन प्रभात’चे संस्थापक-संपादक

५. धर्माधिष्ठित अशा हिंदु राष्ट्राच्या (ईश्वरी राज्याच्या) स्थापनेचा उद्घोष (वर्ष १९९८)

६. ‘हिंदु राष्ट्रा’च्या स्थापनेसाठी संत, संप्रदाय, हिंदुत्ववादी आदींचे संघटन आणि त्यांना आध्यात्मिक स्तरावर दिशादर्शन!

**(संपूर्ण परिचयासाठी वाचा – www.Sanatan.org)**

**सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांचे साधकांना आश्वासन !**

स्थूल देहा असे स्थळकाळाची मर्यादा ।
कैसे असू सर्वदा सर्वा ठायी ।।
सनातन धर्म माझे नित्य रूप ।
त्या रूपे सर्वत्र आहे सदा ।। – जयंत बाळाजी आठवले
१५.५.१९९६

## सद्‌गुरु डॉ. चारुदत्त पिंगळे, एम्.एस्. (ई.एन्.टी.)



‘हिंदु जनजागृती समिती’चे राष्ट्रीय मार्गदर्शक असून भारत आणि नेपाळ या देशांत हिंदु राष्ट्र-स्थापनेसाठी हिंदूसंघटन करतात. त्यांच्या नेतृत्वाखाली प्रतिवर्षी गोवा येथे ‘अ.भा. हिंदू अधिवेशन’ आयोजित केले जाते. ते सनातनच्या अनेक ग्रंथांचे संकलकही आहेत.

---

## अनुक्रमणिका

**(प्रकरणांतील काही वैशिष्ट्यपूर्ण मथळे खाली दिले आहेत.)**


**प्रकरण १ : प्राणीमात्रांच्या जीवनाचा उद्देश, अध्यात्म आणि साधना** ११

१ अ. प्राणीमात्रांच्या जीवनाचा उद्देश ११

१ आ. प्रत्यक्ष जीवन, विज्ञानाची मर्यादा आणि अध्यात्माचे महत्त्व ११

१ इ. साधना म्हणजे काय ? १२

**प्रकरण २ : गुरु आणि गुरुकृपायोगानुसार साधना** १३

२ अ. गुरु १३

२ आ. गुरुकृपायोग १५

२ इ. गुरुकृपा सातत्याने होण्यासाठी ‘गुरुकृपायोगानुसार साधना’ आवश्यक १५

२ ई. गुरुकृपायोगानुसार करावयाच्या साधनेचा सिद्धांत - ‘व्यक्ती तितक्या प्रकृती, तितके साधनामार्ग’ १६

२ उ. गुरुकृपायोगानुसार करावयाच्या साधनेमागील प्रमुख तत्त्वे १७

**प्रकरण ३ : सर्वसाधारणतः साधनेत होणाऱ्या मूलभूत चुका** ३८

३ अ. स्वतःच्या मनाने साधना करणे ३८

३ आ. सांप्रदायिकता ३८

३ इ. गुरु करणे ३ ई. स्वतःला साधक समजणे ३९

**प्रकरण ४ : गुरुकृपायोगानुसार साधनेचे प्रकार** ४१

४ अ. व्यष्टी साधना ४१

४ आ. समष्टी साधना ६०

४ इ. व्यष्टी आणि समष्टी साधना ६५

**प्रकरण ५ : गुरुकृपायोगानुसार साधनेतील वैशिष्ट्यपूर्ण टप्पे** ६६

५ अ. गुरुकृपायोगानुसार निर्गुण ईश्वराची प्राप्ती होण्यातील टप्पे ६६

५ आ. गुरुकृपायोगानुसार कुवतीनुसार (आवडीनिवडीनुसार) टप्प्याटप्प्याने सेवा करवून घेऊन गुरूंनी मोक्षप्राप्तीकडे नेणे ६६

५ इ. गुरुकृपायोगानुसार सांगितलेल्या साधनेतील टप्पे, त्यांच्याशी संबंधित शक्ती अन् ईश्वराचा गुण, वैशिष्ट्य आणि प्रक्रिया (परिणाम) ६८

५ ई. गुरुकृपायोगानुसार साधनेतील टप्पे आणि सेवा ही व्यष्टी अन् समष्टी साधना यांचा सुवर्णमध्य असणे ६९

५ उ. गुरुकृपायोगातील सेवेमुळे साधकांना अल्प आध्यात्मिक पातळीलाही जनलोकातील योगी साधू शकत असणाऱ्या आत्मस्वरूप पोकळीत स्थित असलेल्या जागृत ध्यानावस्थेची स्थिती प्राप्त होणे ७०

**प्रकरण ६ : सांप्रदायिक साधना आणि गुरुकृपायोगानुसार साधना** ७१

६ अ. गुरुकृपायोगातील 'निष्कामातील सकाम' आणि 'पूर्ण निष्काम' अन् इतर संप्रदायांतील 'सकामातील सकाम' अन् 'पूर्ण सकाम' ७१

**प्रकरण ७ : गुरुकृपायोगानुसार साधना केल्यावर येणार्‍या अनुभूती** ७६

७ अ. कर्म, ज्ञान आणि भक्ती यांनी युक्त असलेल्या गुरुकृपा-योगानुसार साधना करणार्‍याला इतर मार्गांच्या तुलनेत अनुभूती लवकर येणे अन् ज्ञानही लवकर मिळणे ७६

७ उ. गुरुकृपायोगानुसार साधना करणार्‍यांवर देवतांनी सूक्ष्मातून पुष्पवृष्टी करणे ७८

卐 **संकलकांचा वैज्ञानिक दृष्टीकोन आणि अन्य माहिती** ८२

---

**टीप :** ग्रंथात काही सूत्रांच्या शेवटी मराठी किंवा इंग्रजी संकेतांक केवळ कार्यालयीन सोयीसाठी दिले आहेत.

## परात्पर गुरु डॉ. जयंत आठवले यांच्या उपाधीविषयीचे विवेचन !

थोर महर्षींनी सहस्रो वर्षांपूर्वी नाडीपट्ट्यांमध्ये भविष्य लिहून ठेवले आहे. या जीवनाडीपट्ट्यांच्या वाचनाच्या माध्यमातून महर्षी सनातन संस्थेला मार्गदर्शन करतात. १३.७.२०२२ पासून ‘सप्तर्षी जीवनाडीपट्टी’च्या वाचनाच्या माध्यमातून सप्तर्षींनी आज्ञा केल्याप्रमाणे परात्पर गुरु डॉ. आठवले यांना ‘सच्चिदानंद परब्रह्म’ ही उपाधी लावण्यात येत आहे. असे असले तरी, त्यापूर्वीच्या लिखाणात किंवा आताही साधक लिहून देत असलेल्या लिखाणात त्यांनी ‘प.पू.’ किंवा ‘परात्पर गुरु’ अशी उपाधी वापरली असेल, तर ती तशीच ठेवली आहे. F (DrV-Nav)

---

## सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांच्या उत्तराधिकार्‍यांच्या उपाध्यांविषयीचे विवेचन !

जीवनाडीपट्टी-वाचनाद्वारे सप्तर्षींनी केलेल्या आज्ञेनुसार १३.५.२०२० पासून सद्गुरु (सौ.) बिंदा सिंगबाळ यांना ‘श्रीसत्‌शक्ति’ आणि सद्गुरु (सौ.) अंजली गाडगीळ यांना ‘श्रीचित्‌शक्ति’ या उपाध्यांनी संबोधले जात आहे. F (DrUtt + SStAG-Nav + SStBS-Nav)

## ‘गुरुकृपायोगानुसार साधना’ या ग्रंथमालिकेचे मनोगत

जीवनातील दुःखांना धैर्याने सामोरे जाण्याचे बळ आणि सर्वोच्च प्रतीचा सतत टिकणारा आनंद केवळ साधनेनेच मिळतो. साधना म्हणजे ईश्वरप्राप्तीसाठी करायचे प्रयत्न. ‘साधनानाम् अनेकता’ म्हणजे अनेक प्रकारच्या साधना असतांना नेमकी कोणती साधना करायची, याविषयी बहुतेकांच्या मनाचा गोंधळ उडतो. त्यातच प्रत्येक पंथ अन् संप्रदाय म्हणतो की, आमचीच साधना सर्वश्रेष्ठ आहे. त्यामुळे त्या गोंधळात अधिकच भर पडते. मग साधना नेमकी कोणत्या मार्गाने करायची ?

वर्ष १९९४ मध्ये एकदा आमचे सद्गुरु प.पू. भक्तराज महाराज (बाबा) यांच्यासह इंदूर येथील आश्रमात असतांना बाबा म्हणाले, ‘‘सर्व योगांत भक्तीयोग श्रेष्ठ.’’ त्यावर आमच्यापैकी एकाने (डॉ. जयंत आठवले यांनी) धारिष्ट करून म्हटले, ‘‘नाही बाबा, ‘गुरुकृपायोग’ सर्वश्रेष्ठ आहे!’’ अतिशय आनंदून बाबा म्हणाले, ‘‘अगदी योग्य बोललात!’’

कर्मयोग, भक्तीयोग, ज्ञानयोग इत्यादी कोणत्याही मार्गाने साधना केली, तरी त्याने ईश्वरप्राप्ती होण्यासाठी अखेर गुरुकृपेविना गत्यंतर नाही. म्हणूनच म्हटले आहे, ‘गुरुकृपा हि केवलं शिष्यपरममङ्गलम् ।’, म्हणजे ‘शिष्याचे परममंगल (मोक्षप्राप्ती) केवळ गुरुकृपेनेच होऊ शकते.’ गुरुकृपेच्या माध्यमातून ईश्वरप्राप्तीच्या दिशेने वाटचाल होणे, यालाच ‘गुरुकृपायोग’ असे म्हणतात. ‘गुरुकृपायोग’चे वैशिष्ट्य म्हणजे सर्व साधनामार्गांना सामावून घेणारा, असा हा ईश्वरप्राप्तीचा सहजसोपा मार्ग आहे.

गुरुकृपा होण्यासाठी गुरुप्राप्ती होणे आवश्यक आहे, असे वाटणे स्वाभाविक आहे; पण येथे लक्षात ठेवावयाचा महत्त्वाचा भाग म्हणजे गुरुकृपेविना गुरुप्राप्ती होत नाही. गुरुकृपा आणि गुरुप्राप्ती होण्यासाठी करावयाची साधना म्हणजेच ‘गुरुकृपायोगानुसार साधना’.

卐 卐

गुरुकृपायोगानुसार साधनेविषयी सर्वांगाने आणि व्यापक दिशादर्शन प्रस्तुत ग्रंथमालिकेत केले आहे. – **संकलक** F (PR 6A1)

卐 卐

## ३२४ ग्रंथ-लघुग्रंथांच्या निर्मितीत खारीचा वाटा असणाऱ्या सनातनच्या साधकांना स्वतःच्या ग्रंथ-निर्मितीचे सारे श्रेय देणारे सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले !

'मी ग्रंथांचे लिखाण करण्यास वयाच्या ४० व्या वर्षी प्रारंभ केला. आता माझ्या ८२ व्या वयापर्यंत (फेब्रुवारी २०२४ पर्यंत) मी ३२४ ग्रंथ-लघुग्रंथ संकलित करून छापायला दिले. माझ्याकडे अजून सुमारे ५,००० ग्रंथ सिद्ध करता येतील, एवढे लिखाण जमा आहे. 'एखाद्या लेखकाकडे ५,००० ग्रंथ सिद्ध होतील एवढे लिखाण असेल', याची कोणी कल्पनाही करू शकत नाही. यासंदर्भात माझा मोठेपणा काहीच नाही. आतापर्यंत ३२४ ग्रंथ-लघुग्रंथ छापता आले, ते केवळ सनातनच्या साधकांमुळे ! ग्रंथलिखाणात साहाय्य करणे; ग्रंथाचे टंकलेखन, मुद्रितशोधन आणि संरचना करणे; ग्रंथातील आकृत्या अन् छायाचित्रे सिद्ध करणे; ग्रंथाचे मुखपृष्ठ आणि मलपृष्ठ बनवणे; ग्रंथाची छपाई करून घेणे इत्यादी सर्वच सेवा साधकांनी केल्यामुळे एवढे ग्रंथ प्रकाशित झाले आहेत. 'यापुढेही उरलेले ग्रंथ साधकच सिद्ध करतील', याची मला निश्चिती आहे !' – **सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले (१७.२.२०२४)** F (DrV-AN + DW-DrKW-Gr)

---

## सनातनच्या ग्रंथसेवेत सहभागी होऊन समष्टी साधना करा !

'मराठी भाषेतील ग्रंथांचे संकलन करणे; मराठी, हिंदी आणि इंग्रजी ग्रंथांचे विविध भाषांत भाषांतर करणे, ग्रंथांची संरचना 'इन्डिझाईन' या संगणकीय प्रणालीत करणे, ग्रंथांची मुखपृष्ठे बनवणे आणि ग्रंथछपाईसंबंधाने करायच्या सेवा' या सेवांमध्ये सहभागी होण्यासाठी संपर्क करा – (०८३२) २३१२६६४ किंवा sankalak.goa@gmail.com

# मनोगत

गुरुकृपेच्या माध्यमातून जीव शिवाशी जोडला जाणे म्हणजे ‘गुरुकृपायोग’. कर्मयोग, भक्तीयोग आणि ज्ञानयोग या साधनामार्गांचा त्रिवेणी संगम असलेला ‘गुरुकृपायोग’ हा ईश्वरप्राप्तीचा सहज मार्ग आहे. गुरुकृपायोगाचे वैशिष्ट्य म्हणजे यात सांगितलेल्या समष्टी साधनेतून निर्गुण उपासना घडून त्याद्वारे ईश्वरापर्यंत लवकर जाता येते. समष्टी साधना म्हणजे समाजाच्या आध्यात्मिक उन्नतीसाठी करावयाचे प्रयत्न. गुरुकृपायोगानुसार साधना म्हणजे, व्यष्टी साधना (वैयक्तिक आध्यात्मिक उन्नतीसाठीचे प्रयत्न) आणि समष्टी साधना (समाजाच्या आध्यात्मिक उन्नतीसाठीचे प्रयत्न) यांचा सुयोग्य समन्वय होय.

या ग्रंथात साधनेचे सिद्धांत, साधनेतील टप्पे आदींविषयी नाविन्यपूर्ण आणि मौलिक माहिती दिली आहे. त्याचप्रमाणे प्रस्तुत ग्रंथात व्यष्टी आणि समष्टी साधना यांचे विविध घटक कोणते अन् ते आचरणात कसे आणावेत, समष्टी साधनेसाठी लागणारे आवश्यक गुण कोणते, गुरुकृपायोगानुसार साधना करणाऱ्याला अल्प आध्यात्मिक पातळीलाही अनुभूती लवकर का येते आणि दुर्मिळ ज्ञानप्राप्ती का होते, यांच्याविषयी अध्यात्मशास्त्रदृष्ट्या अधिक सखोल अन् सूक्ष्म-स्तरावर विवरणही केले आहे.

या ग्रंथातील ज्ञानाचा उपयोग प्रत्येकाला आपली साधना वृद्धींगत करून ईश्वरप्राप्ती करून घेण्यासाठी करता येवो, ही श्री गुरुचरणी प्रार्थना. – **संकलक**

**वाचकांना विनंती ! :** ग्रंथाच्या संदर्भातील आपला अभिप्राय किंवा सूचना टपालाने ‘ग्रंथ विभाग, सनातन आश्रम, २४/बी, रामनाथी, फोंडा, गोवा ४०३ ४०१’ या पत्त्यावर किंवा इ-मेलने ‘sankalak.goa@gmail.com’ या पत्त्यावर कळवाव्यात.